# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २७/०५/२००५ (तहकुब)

मिरा भाईंदर महानगरपालिकेची तहकुब स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक २७/०५/२००५ रोजीची सभा सुचना क्र. ०४, दि. २४/०५/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात शुक्रवार दि. २७/०५/२००५ रोजी दुपारी १२.२० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी श्री. हॅरल बोर्जीस हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | पिठासिन अधिकारी |
| २) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |
| ३) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ४) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ५) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ६) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| ७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ८) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ९) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| १०) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सभापती |
| २) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सदस्य |
| ३) | श्री. मिलन गोविंद पाटील | सदस्य |
| ४) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |

**मा. सभापती (हॅरल बोर्जीस) :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी पुन्हा सुरूवात करावी.

**अनंत पाटील :-**

सभापती महोदय, आपण हा जो जकातीचा विषय घेतलेला आहे. या विषया संदर्भामध्ये शहरातील इतर नागरिकांच्या प्रतिक्रिया काय आहेत?

**मा. सभापती (हॅरल बोर्जीस) :-**

आपणांला स्वतःला ज्ञात असेल तर तशी परिस्थिती असती तर तुमच्यापर्यंत त्या तक्रारी आल्या असत्या आणि प्रशासनाकडेही आल्या असतात.

**रिटा शाह :-**

जेव्हा अग्रवाल ठेकेदार होता त्यावेळी भरपूर तक्रारी होत्या. आता तसे नाही.

**प्रेमनाथ पाटील / अशोक पाटील :-**

ह्या वेळेला जकातीच्या तशा तक्रारी नाहीत.

**मा. सभापती (हॅरल बोर्जीस) :-**

समाधानकारक काम आहे हे आपण सर्व मान्य करता. ही वस्तुस्थिती आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

या ठेकेदाराकडून तशा तक्रारी नाहीत. अग्रवाल ठेकेदार असतांना त्याच्या खुप तक्रारी येत होत्या.

**गजानन भोईर :-**

याबाबत ऑडीटरचे काय म्हणणे आहे?

**मा. सभापती (हॅरल बोर्जीस) :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईरजी मी सभेला कल्पना दिली की, पुर्णपणे हा आपला अधिकार आहे. आपण आपल्या अधिकार क्षेत्रामध्ये ज्या वाढीव अटीशर्ती करायच्या आहेत ते आपण करुन संबंधित प्रस्ताव आयुक्त साहेबांकडे पाठवणार. जर त्याच्यामध्ये आयुक्त साहेबांना काय चुकीचे वाटले तर आयुक्त साहेब तो प्रस्ताव फेटाळतील. आपल्याला आपले अधिकार वापरण्याचे पुर्ण अधिकार आहेत. त्यामुळे तुम्हांला अंतर्गत लेखापरिक्षकाचा आणि मुख्यालयाच्या तोंडून ऐकायला पाहिजे अशातला भाग नाही. आपले जे अधिकार आहेत त्या अधिकारावर गदा येणार नाही.

**अशोक पाटील :-**

ऑडीटरला जर अयोग्य वाटले तर ऑडीटर सांगतील.

**गजानन भोईर :-**

ऑडीटर साहेबांनी एका शब्दात सांगून मोकळे करावे.

**प्रभात पाटील :-**

ऑडीटर येथे उपस्थित आहे आणि त्यांना जर असे काय वाटले असते तर ते बोलले असते.

**मा. सभापती (हॅरल बोर्जीस) :-**

मुळ अटीशर्तींना बाधा न येता ॲडीशनल अटीशर्ती आपण केलेल्या आहेत. त्यात आपणाला काय चुकीचे वाटते ते आपण सांगावे. आपण काहीच चुकीचे केलेले नाही.

**प्रभात पाटील :-**

सन्मा. सभापती साहेब, सन २००५-०६ च्या वर्षाकरिता जी आपण जकात निविदा काढणार आहोत त्या जकात निविदेसाठी मागच्या वर्षीच्या अटीशर्ती कायम ठेवून आणि ह्या वर्षिच्या ज्या सुधारक अटी घातलेल्या आहेत. त्याच्यामध्ये २००४-०५ वर्षामध्ये ज्या ठेकेदाराने हा ठेका घेतला होता त्याच्याशी मला काय म्हणायचे नाही. परंतु, त्याच्या काळामध्ये इथल्या नागरिकांना आणि व्यावसायिकांना त्रास होता तो त्रास आता नव्वद टक्के कमी झालेला आहे. अशाच कंडीशनमध्ये आपण ज्या काही ॲडीशनल अटी येथे नमुद केलेल्या आहेत त्याच्यामध्ये मी एक सुचना मांडत आहे की, जो कोणी हा ठेका घेईल ती एक अट नमुद करावी असे मला वाटते की, इथल्या व्यापाऱ्याना, इथल्या व्यावसायिकांना आणि इथल्या नागरिकांना निदान महिलांना तरी कोणत्याही प्रकारचा त्रास दिला जाऊ नये अशी अट किंवा सुचना त्यात नमुद करुन ह्या अटीशर्ती मंजुर करण्यांत याव्यात असा मी ठराव मांडत आहे.

**सुर्यकांत भोईर / प्रेमनाथ पाटील :-**

सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, आपण हे मंजुर केले. पण जी वसुलीची पद्धत आहे तर फक्त खाण्यासाठी विक्रीसाठी जे आयात केलेले पदार्थ आहेत त्याच्यावरच तो जकात घेईल असे आहे. जर एखादी वस्तु मी वापरण्यासाठी आणली. उदा. सिमेंट मी माझ्यासाठी वापरतो तर जकात घेणार नाही का?

**प्रेमनाथ पाटील :-**

जकात घेणार.

**जोजफ घोन्सालवीस :-**

कसे घेणार? अट बघा नाही क, विक्रीसाठी आणि खाण्यासाठी जे पदार्थ आयात केले जातील त्याच्यावरच तो ऑक्ट्रॉय घेईल. मग मी वापरासाठी आणले तर कसे ऑक्ट्रॉय घेईल.

**प्रकरण क्र. १८ :-**

जकात निवीदेतील अटीशर्ती ठरविणेबाबत. (दि. २४/०५/२००५ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १६)

**ठराव क्र. २१ :-**

जकात निविदेकरीता खालीलप्रमाणे अटीशर्ती करण्यांत येत आहेत.

१. निविदा धारकाने कॉल डिपॉसिट म्हणून रक्कम रु. २ करोड इसारा रक्कम द्यावी.

२. निविदा धारकाने कोणत्याही राष्ट्रीयीकृत अथवा शेड्युल बँकेकडून बँक गॅरंटी रक्कम रु. ६ करोड ४० लाख त्याची निविदा स्विकारल्यानंतर भरील असे नॅशनलाईज्ड बँकेचे अथवा शेड्युल बँकेचे पत्र सोबत जोडावे.

३. प्रत्येक निविदा धारकाने त्याीच ऑफर ठराविक नमुन्यात घ्यावी. व त्यासोबत कोणत्याही अधिक अटी व शर्ती काढू नयेत.

४. निविदेचा फॉर्म (देयक) हे निटनेटके कोणत्याही प्रकारची खाडाखोडा अथवा (Over writing) करु नये. आणि तसे केल्यास त्याचे टेंडर (देयक) बाद ठवलि जाईल. जर त्याच्या टेंडर फॉर्ममधील दुरुस्तीबद्दल त्याची पूर्ण सही नसेल.

५. ऑफर ही शब्दात व आकड्यात लिहीलेली असली पाहीजे.

६. निविदा धारकाने फक्त एकच निविदा दाखल करावे जर त्याने एकापेक्षा अधिक निविदा दाखल केल्यास त्याचे सर्वात उच्च ऑफर स्विकारली जाईल.

७. निविदेवर सही करणाऱ्या इसमाने तो त्या निविदेवर काय म्हणून सही करत आहे याचा स्पष्ट उल्लेख ऑफरमध्ये करावा. जसे स्वतंत्र मालकीच्या फर्मचा मालक, संबंधित कंपनीचा सेक्रेटरी अथवा मॅनेजर अथवा डायरेक्टर मर्यादित कंपनी जर निविदाधारक ही भागीदारी संस्था असल्यास सर्व भागीदारांच्या नांव व पत्त्यासह तसेच भागीदारी फर्मची प्रमाणित प्रत ऑफरसोबत द्यावी. जर निविदाधारक ही लिमिटेड कंपनी असल्यास सर्व डायरेक्टरांची नावे यादीसह व कंपनी रजिस्टर्ड असल्याच्या प्रमाणपत्रासह निविदेसोबत जोडावी व त्यात त्या कंपनीने सह्या करण्याचा अधिकार कुणाला दिलेला आहे याचा स्पष्ट उल्लेख करावा. तसेच त्यांच्या निविदेसोबत कंपनीची नियमावलीची एक प्रत निविदेसोबत द्यावी.

८. निविदा दाखल करणारी कंपनी अथवा निविदा धारक यांनी त्यांच्या संस्थेचे मागील तीन वर्षाचे ताळेबंद पत्रक निविदेसोबत जोडावे. तसेच त्या निविदेमध्ये त्याची ऑफसेट प्राईज ४० कोटी रु. व पन्नास टक्क्यांपेक्षा कमी म्हणजे वीस कोटी पेक्षा कमी असता कामा नये. निविदा धारकाने त्यांच्या निविदेसोबत त्याच्या संस्थेचे ताळेबंदपत्रक मागील तीन वर्षाचे हिशोब तपासणीसाठी रिपोर्टासह निविदेसोबत जोडावे ज्यात त्याची प्रत्येक वर्षाची वार्षिक उलाढाल वीस कोटीपेक्षा कमी असता काम नये. एजंट अथवा निविदा धारकाला जकात कामाचा तसेच त्याच्या समान कामाचा अनुभव असला पाहिजे. निविदा धारकाने तसे प्रमाणपत्र त्याच्या निविदेसोबत जोडावे.

९. निविदाधारकाने त्याची निविदा दोन वेगवेगळ्या लिफाफ्यात द्यावी. लिफाफा नं. २ मध्ये कराराची रक्कम भरलेला लिफाफा जेव्हा उघडला जाईल तेव्हा लिफाफा नं. १ मध्ये ईसारा रक्कम रु. २ करोड रोख भरणा केल्याची पावती किंवा राष्ट्रीयकृत अथवा शेड्युल्ड बँकेचा डिमांड ड्राफ्ट जमा केल्याची पावती असावी. तसेच त्यासोबत राष्ट्रीयकृत अथवा शेड्युल्ड बँकेची बँक गॅरेंटी रक्कम रु. ६ करोड ४० लाख देण्यास तयार असल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडावे. तसेच त्याचे सोबत मागील तीन वर्षाच्या ताळेबंदर पत्रकाचे प्रमाणित प्रती कि जे कंपनीची वार्षिक उलाढाला रक्कम रु. २० करोडपेक्षा जास्त असल्याचे प्रमाणित करेल. आणि त्या रक्कमेच्या स्वरुपात जकात अभिकर्ता म्हणून एक वर्षाचे काम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र असावे. वरिल सर्व अटी या प्राथमिक अटी समजण्यात येतील. मा. आयुक्त स्थायी समितीची मंजुरी घेवून एखादी ऑफर कोणतेही कारण न देता मंजूर करु शकतील अथवा नाकारु शकतील. निविदा धारकास त्याची निविदा नामंजूर केल्यास कोणत्याही प्रकारचा हक्क, कोणतीही रक्कम व नुकसान मागता येणार नाही.

१०. संबंधित निविदा धारकाने अगोदर जर एखाद्या महापालिकेचे अथवा नगरपरिषदेचे जकात वसुलीचे काम केलेले असेल तर त्या ठिकाणी सदर ठेकेदाराने काम समाधानकारक रित्या केले असल्याचा त्या संबंधित महापालिकेचा अथवा नगरपरिषदेचा दाखला असणे बंधनकारक असेल.

११. निविदा धारकास कुठल्याही महापालिकेचा कमीत कमी एक वर्षाचा जकात वसुलीचा अनुभव असावा व तो संबंधित निविदेच्या रक्कमेच्या तुलनेत बरोबरीचा असावा. व त्याने घेतलेला ठेका हा पूर्ण केलेला असावा.

१२. भागीदारी संस्थेचा अर्ज तेव्हाच स्विकारण्यात येईल. जेव्हा भागीदारी करारनामा नोंदी असणे आवश्यक आहे व त्या करारनाम्यासोबत सदर नोंदणीची प्रत जोडणे बंधनकारक आहे.

१३. निविदा प्रसिद्ध करण्याचा कालावधी हा दि. ३०/५/२००५ ते ९/६/२००५ संध्या. ४.०० वा. पर्यंत असेल. इसारा रक्कम भरणा करावयाचा कालावधी दि. ९/६/२००५ संध्या. ४.०० पर्यंत असेल व निविदा भरण्याचा कालावधी दि. १०/६/२००५ दुपारी ४.०० पर्यंत असेल व सदर निविदा ही त्याच दिवशी दुपारी ५.०० वा. उघडण्यांत येईल.

**जकातीचे दर व ती वसूल करण्याची पद्धती :-**

एजंट अथवा गुत्तेदार हा महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दराने शहरात आयात होणाऱ्या खप वापर विक्रीसाठी आलेल्या मालावर जकात आकारेल. सदरचा हुकुम हा एक वर्षाच्या काळासाठी

असेल. एजंट हा वरील जकात त्याची स्वतःची माणसे (नोकर) नेमून करेल. महानगरपालिकेने वेळोवेळी वाढवलेल्या वस्तुंवर ठरविलेल्या दराने जकात आकारेल.

वरील प्रमाणे नमुद अटिशर्ती निविदेमध्ये अंतर्भूत करण्यास स्थायी समिती निर्देश देत असून त्यास मंजूरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, मागच्या सभेत औषधावर जो प्रश्न उपस्थित झालेला होता तो स्थगित आहे. तो विषय पुढच्या सभेत घ्या अशी मी सुचना मांडत आहे.

**मा. सभापती (हॅरल बोर्जीस) :-**

सचिव साहेब, मागच्या सभेत जो औषधाच्या बाबतीमध्ये स्थागित विषय होता तो आगामी स्थायी समितीच्या विषयपटलावर विषय घ्यावा असे मी तुम्हांला निर्देशन देत आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

औषधांचा विषय गेल्या सभेत फेटाळला आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

फेर विषय घ्यावा असे मी सुचवित आहे.

**गजानन भोईर :-**

फेटाळलेला विषय पुढच्या सभेत घेता येत नाही. याबाबत सचिव साहेबांनी माहिती द्यावी.

**प्र. सचिव :-**

फेटाळलेला प्रस्ताव तीन महिन्यानंतर घेण्यांत येतो.

**मा. सभापती (हॅरल बोर्जीस) :-**

स्थगित विषय आहे. आगामी स्थायी समितीच्या विषयपटलावर घेण्यांत येईल.

**प्रभात पाटील :-**

इतिवृत्तांत बघा. तो स्थगित आहे की, फेटाळण्यांत आला आहे?

**सुर्यकांत भोईर :-**

इतिवृत्तात बघा. जर विषय फेटाळलेला असेल तर तीन महिन्यानंतर विषय घ्या आणि जर स्थगित असेल तर पुढच्या सभेत विषय घ्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

विषय फेटाळलेला आहे.

**मा. सभापती (हॅरल बोर्जीस) :-**

स्थगित विषय असेल तर आगामी स्थायी समितीच्या विषयपटलावर विषय घ्या. सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १२.३० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**